Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# सामाजिक न्यायाचे प्रणेते: क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले

**डॉ. राजीव आबाराव काळे**
**९४२२४८८४६६**

नको मागे फिरू तु अशी पाठ दाखवून
लढ रे मना हिम्मत तु साठवून
जाईल हे ही वादळ थोडा वेळ घोघालुन
तगायचय तुला आपल्यांना आठवून
लक्ष्यात ठेव प्रत्येक वादळा ला शेवट हा असेलच
घाबरला आहेस तरी निट बघ मार्ग तुला दिसेल
माहित आहे दुबळा आहेस तु टिकायला
काहीच नाही आहे तुझ्याकडे लढायला
तरी ही ललकारया देत रहा ओरडून ओरडून
लक्ष्यात ठेव वादळच खुप काहि शिकवितात
प्रत्येक वेळी ते तुमच आयुष्यच बदलवितात
उपयोग कर त्यांचा स्वतःचा तपासायला
काय आहोत आपण? आणि काय होवू शकतो हे जानायला
नको हाथ पाय गाळू रूप त्याचे पाहून
स्वार हो त्यावर लढायचे ठरवून
नको मागे फिरू तु आशी पाठ दाखवून
लढ रे मना हिम्मत तु साठवून. .

या कवितेच्या ओळी वाचल्या की, आठवतो तो संघर्ष. तत्कालीन समाजाच्या अनेक प्रश्नांना महात्मा जोतीराव फुले यांनी दिलेले  कृतीयुक्त उत्तर. महात्मा जोतीराव फुले यांनी संबंध आयुष्यभर स्त्री-शुद्राधि शुद्र,उपेक्षित समाजाला सामाजिक न्याय मिळवुन दिला.  म्हणुनच माणसाला माणसांची ओळख निर्माण झाली. सर्व अन्यायाचे, अत्याचाराचे कारण महात्मा जोतीराव फुले यांनी शोधले आणि तमाम मानव जातीला आत्मसन्मानाचा मार्ग मिळवुन दिला. आज संबध मानवाच्या मनावर महात्मा म्हणुन जोतीराव फुले यांनी अधिराज्य निर्माण केले आहे.

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली।

नितिविना गती गेली। गतिविना वित्त गेले।

वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले।

हा साक्षरतेचा मूलगामी विचार देशाला देणारे जोतीराव फुले खरे महात्मा ठरले. तत्काळातील लिखित-अलिखित नियम हे माणसाला माणुस म्हणून जगण्याचा अधिकार देत नव्हते. वर्ण व्यवस्थेमध्ये अडकलेला हा समाज न्यायाच्या याचना करत होता. जस फळ मिळायची असतील तर आधि बीजाला गाढुन घ्याव लागतं. अगदी त्याप्रमाणे च समाजाला न्यायाची फळे चाखता यावेत या उद्दात्त व निस्वार्थ भावनेतून महात्मा जोतीराव फुले यांनी स्वतःला बीजरूपी गाढून घेतले. म्हणुन आज शिक्षणाच्या माध्यामातून आपण सर्वजण ही फळे चाखत आहोत. हे उपकार विसणे इतके  कृतघ्न नाहीत. महात्मा जोतीराव फुले

यांनी झेललेला संघर्ष, भोगलेला अन्याय हा इतिहास जमा करून चालणार नाही. तर त्यांना अपेक्षित समाज निर्माण करणे हे प्रत्येकाचे कर्तृत्व आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा जोतीराव फुले यांना गुरू मानुन त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. सावित्रीमाई ला शिक्षिका बनवले, पाण्याची विहिर खुल्ली केली, मुलींची पहिली शाळा काढली, बाल हत्या प्रतिबंधक गृह स्थापन करणे, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज समाधी जिर्णोध्दार करणे, शिवजयंती साजरी करणे, पहिला पोवाडा लिहिणे आदि कार्ये आम्ही सहज सांगत अथवा वाजत असलो तरी एक गोष्ट महत्वाची आहे. हे ज्याकाळात जोतीराव फुले यांनी केले तो काळ, ती परिस्थिती विचारात घ्यावी लागेल. हे कार्य देशाला प्रेरणादायी आहे हे सत्य नाकारता येणार नाही.

आज महात्मा जोतीराव फुले यांची आपण १९३ जयंती साजरी करत आहोत. पण जयंतीचे वर्ष उलटून जातात तरीही अपेक्षित समाज आज ही उपेक्षित राहतो. महात्मा जोतीराव फुले यांना मार्टिन ल्युथर यांची उपमा दिली आहे. कदाचित जोतीराव फुले यांचे काम त्याहुन ही मोठे असेल यात शंका नाही. कारण संत तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे पाहिजे जातीचे, एरा गबाळाचे काम नोहे. महात्मा जोतीराव फुले हे जातिवंत होते. ज्या समाजात श्रमजीवी, शुद्र यांचा जन्म झाला त्यात त्याचा दोष काय? हा प्रश्न घेऊन ते लढले. साक्षरते शिवाय शुद्रांंचा तरणोपाय नाही. म्हणुनच चंद्रमोळी झोपडी पर्यंत आज शिक्षण पोहंचले आहे. १८८२ ला हंटर कमिशन समोर प्राथमिक शिक्षण मोफत करण्याची मागणी

करणारे पहिले शिक्षण प्रेमी होय. त्या अगोदर ही घराच्या उंबरठ्यावर शिक्षणाला विरोध असतांना शिक्षणाची कास सोडली नाही.

सावित्रीमाई ला सोबत घेऊन शिक्षणाचा महायज्ञ सुरू केला. सावित्रीमाई ची खंबीर साथ असल्याने जोतीराव फुले यांना महात्मा होता आले. सावित्रीमाई नी चिखल-माती अंगावर झेलली तर एक हजार रूपयांच्या बदल्यात मारेकरी म्हणुन आलेले धोंडिबा रोडे यांच्या सारखे असंख्य महात्मा जोतीराव फुले यांचे सहकारी झाले.

धनसत्ता, ज्ञानसत्ता आणि राजसत्ता या उच्चवर्णियांच्या व विशिष्ट समाजाच्या हाती एकवटल्यामुळे तो वर्ग इतरांना तुच्छतेनं वागवत आहे. हे बहुजण समाजाने लक्षात घेणे गरजेचे आहे. या सत्ता आपल्या हाती घेण्यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. राजकारण देखील डोळसपणे करणे ही काळाची गरज आहे. कारण खोटा मुखवटा धारण केलेल्या समाजाला खरा चेहरा दाखवण्याचे काम जोतीराव फुले यांनी केले आहे. खरा - खोटा चेहरा शिक्षणामुळे लक्षात येतो. महात्मा जोतीराव फुले यांचे कार्य हे प्रेरणादायी आहे. फुले हा केवळ वाचनाचा, व्याख्यानाच विषय नाहीत तर तो जीवनाचा आमुलाग्र बदल घडवुन आणणारा विचार आहे. असे कोणते क्षेत्र नाही ज्यावर महात्मा जोतीराव फुले यांनी लेखन केले नाही. त्यांचे जीवन क्रांतिकारी कृत होते. अनेक साहित्य प्रकार त्यांनी लिहिले. जोतीराव फुले यांचे वाड्मय समाजक्रांतीची, व्यापक परिवर्तनाची, परिभाषा सांगणारे व समतेची दिशा देणारे आहे. महात्मा जोतीराव फुलेंनी फक्त

महाराष्ट्रालाच नाही तर देशाला समाजाकडे बघायचा नवा दृष्टिकोन दिला आहे. केवळ जयंती - स्मृतीदिनालाच त्यांची आठवण काढणे ही कदाचित कृर्तघ्नता ठरेल. त्याकरिता जोतीराव होता नाही आले तर तसे जगण्याचा प्रयत्न करावा लागेल. उपेक्षा, अपमान यांचा स्वीकार करून हे सत्यकार्य पुढे घेऊन जाण्याची आपल्या सर्वांची जबाबदारी आपल्या सर्वांना पार पाडावीच लागेल. महात्मा जोतीराव फुले यांच्या विचाराचा हा ज्ञानाचा दिवा आपणा सर्वांना तेवत ठेवावा लागेल.

**संदर्भ :-**

१) महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार. - गं. बा. सरदार

२) गुलामगिरी संपा. डॉ. वासुदेव मुलाटे